| MHKO030112942023 | स.फौजदारी खटला क्रमांक ८६८२/२०२३<br>निशाणी क्रमांक ४१ खालील आदेश<br>संजय शंकरराव पाटील<br>वि.<br>जोतिबा नारायण कोनेरी |
|---|---|

१. प्रस्तुतचा अर्ज आरोपींनी त्यांचेविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश सेट असाईड होऊन मिळणेकरीता केलेला आहे.

आरोपींची थोडक्यात विनंती खालीलप्रमाणे -

२. प्रस्तुत कामी दि. ०९/०५/२०२५ रोजी आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश झालेला आहे. तथापि, आरोपी हे त्यांच्या व्यवसायिक कामानिमित्त बेंगलोर येथे राहत होते. त्यामुळे आरोपी यांना नेमले तारखेस हजर राहता आले नाही. आरोपीनी जाणुनबुजून फिर्यादीचा उलटतपास घेणेचे टाळलेले नाही. आरोपीविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा हुकूम सेट असाईड न झाल्यास आरोपीचे अतोनात असे न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट सदरचा अर्ज मंजूर झालेस फिर्यादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश सेट असाईड होवून आरोपींना फिर्यादीचा उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी. करीता सदरचा अर्ज.

३. फिर्यादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर केले. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, अर्जातील कथने धादांत खोटी, लबाडीची रचनात्मक असून चुकीची आणि रेकॉर्डवरील वस्तुस्थिती विरुध्द आहे. आरोपी प्रस्तुतकामी सुरवातीपासूनच जाणीपुर्वक गैरहजर रहात असलेने २ वेळा आरोपी विरूध्द उलट तपास नाही चा आदेश झाला आहे. आरोपी जाणीवपुर्वक गैरहजर राहत असलेने त्याचे क्रि.प्रो.कोड. क्र. ३१३ खालील निवेदन कोर्टांनी निरस्त करून काम युक्तीवादकामी नेमले आहे. दि. ०६/०२/२०२६ रोजी प्रस्तुतकामी आरोपीविरूध्द वर्तमानपत्रात उद्घोषनाप्रत प्रतिसध्द केलेनंतर आरोपी हजर झाला आहे. आरोपीस बचावाची पुर्ण संधी देवूनही आरोपीने जाणीवपुर्वक काम टाळले आहे. अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा. करीता सदरचे म्हणणे.

४. दोन्ही बाजूच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द दि.०९/०५/२०२५ रोजी उलटतपास नाहीचा आदेश पारीत झाल्याचे दिसून येते. फिर्यादीने प्रस्तुत अर्जावर जोरदार हरकत घेतली आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रस्तुत प्रकरण शीघ्र गतीने गुणावगुणांवर

निर्णित होण्यास मदत होईल, अनेक अर्जांची उत्पत्ती टाळता येईल आणि आरोपीची बाजू अभिलेखावर येण्यास मदत होईल. खटल्याचा निकाल गुणवत्तेवर होणेकरीता अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परंतु अर्जाकामी आरोपीने केलेल्या खटल्यातील दिरंगाईची बाब विचारात घेता आरोपी यांचेवर योग्य ती कॉस्ट आकारुन ती फिर्यादीला देणे उचित होईल.करीता मी खालीलप्रमाणे न्यायोचित आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींविरुध्द दिनांक ०९/०५/२०२५ रोजी झालेला उलटतपास नाहीचा आदेश आरोपींनी र. रु. २,०००/- कॉस्ट फिर्यादीला देण्याच्या अटीवर सेट असाईड करण्यात येत आहे. |

Digitally signed by NITIN RAMESH BHALGAT
Date: 2026.03.02 13:02:58 +0530

कोल्हापूर.
दिनांक. ०२/०३/२०२६

(एन.आर.भळगट)
६ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,कोल्हापूर.